महाराष्ट्र शासन
**मृद व जलसंधारण विभाग**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, ७ वा मजला, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दूरध्वनी क्र. : ०२२-२२०२९१३२
Email ID : mrudula.deshpande@nic.in

क्रमांक: आस्थाप-२०२४/प्र.क्र.८५/जल-८
दिनांक: ०६ ऑगस्ट, २०२४

## जाहिरात (मुदतवाढ)

मृद व जलसंधारण विभागाच्या अधिपत्याखालील वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे या कार्यालयातील पुढील पदे, केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना – पाणलोट विकास घटक २.० ही योजना राबविण्याच्या विवक्षित कामाकरिता (१) अपर मुख्य कार्यकारी अधिकारी, गट-अ, (२) सह मुख्य कार्यकारी अधिकारी, गट-अ, (३) उप मुख्य कार्यकारी अधिकारी, गट-अ, (४) तंत्र अधिकारी, गट-ब (५) प्रशासन अधिकारी, गट-ब ही रिक्त पदे प्रतिनियुक्तीने वा करार पध्दतीने सेवानिवृत्त अधिकाऱ्यांमधून भरण्याकरिता व (६) कृषी पर्यवेक्षक, गट-क व (७) कृषी सहाय्यक, गट-क ही पदे प्रतिनियुक्तीने भरण्याकरिता दि.२६ जुलै, २०२४ च्या शासन परिपत्रकान्वये इच्छुक उमेदवारांचे अर्ज मागविण्यात आले आहेत.

- सदर जाहिरातीस अनुलक्षून इच्छुक उमेदवारांस अर्ज सादर करण्यास दि.०९.०८.२०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.
- उक्त दि.२६.०७.२०२४ च्या परिपत्रकातील पात्रता, इतर अटी-शर्ती कायम आहेत, याची नोंद घ्यावी.
- इच्छुक उमेदवारांनी त्यांची इच्छुकता खाली नमूद केलेल्या पत्त्यावर पाठवाव्यात.
  श्रीमती मृ. सं. देशपांडे, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग, ७३२ विस्तार इमारत, सातवा मजला, मंत्रालय, मुंबई ४०००३२. ई-मेल : mrudula.deshpande@nic.in

सदर जाहिरात शासनाच्या www.maharashtra.gov.in व विभागाच्या swcd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

मृ.सं.देशपांडे

( मृ. सं. देशपांडे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन